| CNR-MHAK080000212018 | | | |
|---|---|---|---|
| | **दाखल दिनांक** | : | ०५/०१/२०१८ |
| | **नोंदणी दिनांक** | : | ०५/०१/२०१८ |
| | **निकाल दिनांक** | : | ०६/०३/२०२६ |
| | **कालावधी** | : | ०८ ०२ ०१<br>व. म. दि. |

**<u>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, बार्शिटाकळी, जि. अकोला यांचे न्यायालयात</u>**

(पिठासीन अधिकारी एम.के.कुरे)

(न्यायनिर्णय घोषित दि. ०६/०३/२०२६)

**नियमित फौजदारी खटला क्र.०९/२०१८**

| | |
|---|---|
| **निशाणी क्रमांक** ८३ | अपराध क्रमांक : ३१०/२०१७<br>पोलीस स्टेशन : बार्शिटाकळी,<br>ता. बार्शिटाकळी, जि. अकोला |
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र सरकार,<br>तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन बार्शिटाकळी,<br>ता. बार्शिटाकळी, जि. अकोला.<br>**मुळ तक्रारकर्ता : विनोद जानराव सुलताने,**<br>रा. राजंदा, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला. |
| **अभियोग पक्षातर्फे वकिल** | श्रीमती एन.एम.राउत,<br>सहाय्यक सरकारी वकिल |
| **आरोपी** | **१. गजानन किसनराव सुलताने,**<br>वय : ५० वर्षे, व्यवसाय : मजुरी, |
| | **२. ज्ञानेश्वर बाळु सुलताने,**<br>वय : २५ वर्षे, व्यवसाय : मजुरी, |

| | |
|---|---|
| | **३. शंकर गजानन सुलताने,**<br>वय : २३ वर्षे, व्यवसाय : मजुरी,<br>सर्व रा. राजंदा, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला. |
| **आरोपींतर्फे विधीज्ञ** | श्री. ए. एस. पांडे |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारिख | १६/१०/२०१७ |
| प्रथम खबरी अहवाल दाखल झाल्याची तारीख | १६/१०/२०१७ |
| दोषारोपत्र दाखल तारीख | ०५/०१/२०१८ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | ३०/१२/२०२२ |
| पुराव्यास सुरुवात झाल्याची तारीख | ०१/११/२०२५ |
| निकाल राखुन ठेवल्याची तारीख | ०६/०३/२०२६ |
| निकालाची तारीख | ०६/०३/२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास त्याची तारीख | लागू नाही. |

## आरोपीची सविस्तर माहिती

| **आरोपीचा क्रमांक** | **आरोपीचे नाव** | **अटकेची तारीख** | **जमानतवर सोडल्याचा दिनांक** |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | गजानन किसनराव सुलताने | ०६/११/२०१७ | ०६/११/२०१७ |
| २ | ज्ञानेश्वर बाळु सुलताने | ०६/११/२०१७ | ०६/११/२०१७ |
| ३ | शंकर गजानन सुलताने | ०६/११/२०१७ | ०६/११/२०१७ |

| गुन्हा ठेवल्याचा तपशील | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा केली. | किती शिक्षा दिली | खटला चालू असतांना आरोपी कारागृहात |
|---|---|---|---|

| | | | असल्याबाबतचा तपशील |
|---|---|---|---|
| ५ | ६ | ७ | ८ |
| भा.दं.वी. कलम ३२४ व ५०४ सहकलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | लागू नाही | लागू नाही |

## **– न्या य नि र्ण य –**

(पारीत दिनांक : ०६/०३/२०२६)

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ व ५०४ सहकलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयाच्या आरोपांसाठी अभियोग चालविला जात आहे.

**२.** सरकार पक्षाचे थोडक्यात म्हणणे असे की, दिनांक १६.१०.२०१७ रोजी २०:०० वाजताचे सुमारास ग्राम राजंदा, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला येथे आरोपी हे फिर्यादीचे घरासमोर बैलगाडीवर बसुन जोरजोरात बोलत असतांना त्यांना फिर्यादीने तेथुन जाण्यास सांगीतले असता आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी व फिर्यादीचे वडीलांना शिवीगाळ करुन लाकडी काठ्यांनी मारहाण करुन जखमी केले. म्हणुन फिर्यादीने पोलिस ठाणे बार्शिटाकळी येथे आरोपींविरुध्द रितसर फिर्याद नोंदविली.

**३.** सदर फिर्याद वरुन संबंधीत पोलिस ठाण्याच्या ठाणे अंमलदार यांनी आरोपीवर गुन्हा क्रमांक ३१०/२०१७ ची नोंद भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४ सहकलम ३४ अन्वये केली सदर गुन्हयाचा तपास तपास अधिकारी यांनी करुन आरोपींविरुध्द पूरावा गोळा करुन न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले.

**४.** आरोपी हजर झाल्यानंतर त्यांचेविरुध्द निशाणी क्र.१५ वर भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ व ५०४ सहकलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र गुन्हयाच्या

आरोपांसाठी दोषारोप निर्धारीत केले. आरोपींना ते त्यांच्या बोलिभाषेत वाचून व समजावून सांगितले. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगून अभियोगाची मागणी केली.

**५.** फिर्यादीचा पुरावा झाल्यानंतर त्यांच्या पुराव्यामध्ये आरोपींविरुध्द दोषारोप सिध्द होणेइतपत कुठलाही पुरावा न आल्यामुळे व आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये आपसी तडजोड पुरसिस (नि.क्र.७४) झाल्यामुळे, फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ अन्वये जबाब नोंदविण्यात आला नाही.

**६.** सरकारपक्षाचा व आरोपीच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. संचिकेतील पुरावा व कागदपत्रे पाहता खालील मुद्दे माझ्या निष्कर्षासाठी उपस्थीत होतात. त्यावरील उत्तरे मी नमुद कारणांसहीत देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सरकारपक्ष हे सिध्द करतो काय की,दिनांक १६.१०.२०१७ रोजी २०:०० वाजताचे सुमारास ग्राम राजंदा, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला येथे आरोपी क्र.१ ते ३ यांनी संगनमत करुन फिर्यादी व फिर्यादीचे वडीलांना लाकडी काठ्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहोचविली आणि त्यायोगे भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ सहकलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला ? | .... नाही |
| २. | सरकारपक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपी क्र. १ ते ३ यांनी संगनमत करुन फिर्यादीला व त्यांचे वडीलांना उद्देशपुर्वक अपमान करुन प्रक्षोभित केले आणि अशा प्रक्षोभनामुळे सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य | |

| | | |
|---|---|---|
| | कोणताही अपराध घडावा असा हेतु होता आणि त्यायोगे भारतीय दंड विधानाचे कलम ५०४ सहकलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला? | .... नाही |
| ३. | आदेश काय ? | आरोपींना निर्दोष मुक्त केले. |

**– का र ण मि मां सा –**

**मुद्दा क्र. १ व २ करीता :–**

**७.** आरोपींविरुध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने हे सिध्द करणे गरजेचे आहे की, आरोपी क्र. १ ते ३ यांनी संगनमत करुन फिर्यादी व फिर्यादीचे वडीलांना शिवीगाळ करुन काठ्यांनी मारहाण केली.

**८.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले फिर्यादी विनोद जानराव सुलताने (स.सा.क्र.१) (नि.क्र.७८) यांनी कथन केले की, ते आरोपींना ओळखतो, कारण ते त्यांच्या गावात राहतात. घटना कधी, कुठे व काय घडली हे त्यांना माहीत नाही. असे काही घडले नव्हते की, आरोपींनी त्यांना काठीने मारहाण केली, तसेच शिवीगाळ केली. सहीपुरते नि.क्र.७९ व ८० वरील जबानी रिपोर्ट व छापील प्रथम खबरी अहवालावर त्यांचा अंगठा असल्याचे सांगीतले. परंतु त्यातील मजकूर पोलीसांनी त्यांच्या सांगण्याप्रमाणे लिहीला होता किंवा नाही हे त्यांना आठवत नाही. पोलीसांनी त्यांची चौकशी करुन बयाण नोंदविले होते. सदरहू साक्षीदाराने अभियोग पक्षास त्यांची जबाणी रिपोर्ट प्रमाणे घटना कथन न केल्यामुळे त्यांचा उलटतपास घेण्यात आला असता, सदर साक्षीदाराने संपूर्ण घटना अमान्य केली व आरोपीं सोबत न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झाल्याबाबत सांगितले.

**९.** अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार जानराव श्रीराम सुलताने

(स.सा.क्र.२) (नि.क्र.८१) यांनी कथन केले की, ते आरोपींना ओळखतात, कारण ते त्यांच्या गावात राहतात. घटना कधी, कुठे व काय घडली हे त्यांना माहीत नाही. असे काही घडले नव्हते की, आरोपींनी त्यांना व त्यांच्या मुलाला काठीने मारहाण केली, तसेच शिवीगाळ केली. पोलीसांनी त्यांची चौकशी करुन बयाण नोंदविले होते. सदरहू साक्षीदाराने अभियोग पक्षास त्यांची जबाणी रिपोर्ट प्रमाणे घटना कथन न केल्यामुळे त्यांचा उलटतपास घेण्यात आला असता, सदर साक्षीदाराने संपूर्ण घटना अमान्य केली व आरोपीं सोबत न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झाल्याबाबत सांगितले.

**१०.** एकंदरीत सरकारपक्षाने जो पुरावा सादर केला त्यावरुन घटनेच्या दिवशी आरोपी क्र. १ ते ३ यांनी फिर्यादी व फिर्यादीचे वडीलांना लाकडी काठ्यांनी मारहाण केली तसेच शिवीगाळ केली, हे दर्शविण्यासाठी कोणताही पुरावा अभियोग पक्षातर्फे अभिलेखावर आलेला नाही. तसेच आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये आपसी तडजोड झाल्याबाबत संयुक्त पुरसिस नि.क्र.७४ वर दाखल करण्यात आली आहे. साक्षीदार क्र.१ व २ यांनी अभियोग पक्षास पुरक अशी साक्ष न दिल्यामुळे व ते फितुर झाल्यामुळे आरोपींना दोषी धरणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे अभिलेखावर उपलब्ध साक्षी पुराव्यावरुन असे निर्दशनास येते की, अभियोग पक्ष आरोपींचा गुन्हा निसंदेहरित्या सिध्द करण्यास असमर्थ ठरले आहे. सबब, आरोपी क्र.१ ते ३ हे संशयाचा लाभ मिळण्यास पात्र आहे. सबब मुद्दे क्रमांक १ व २ चा निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदवीत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ३ करीता</u> :-**

**११.** वरील मुद्दा क्र. १ व २ चा निष्कर्ष 'नकारार्थी' असल्याने आरोपींवर ठेवलेल्या दोषारोपांवरुन ते निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. तसेच फिर्यादीने मुद्दाम किंवा हेतूपूरस्सर खोटी फिर्याद आरोपींविरुध्द दिली किंवा खोटी साक्ष दिली असे दिसून येत नाही. त्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम १९५ सह कलम ३४० अन्वयेची कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. अभियोग पक्षाने जर सदर

न्यायनिर्णयाविरुध्द आव्हान केले तर त्या न्यायालयाकडे हजर राहण्यासाठी आरोपींनी कलम ४३७–अ प्रमाणे जामिन देणे गरजेचे आहे. सदर जामिन हा पुढील सहा महिन्याकरीता वैध राहील. या सर्व कारणांचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१ **गजानन किसनराव सुलताने**, आरोपी क्र.२ **ज्ञानेश्वर बाळु सुलताने**, आरोपी क्र.३ **शंकर गजानन सुलताने** यांची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान कलम ३२४ व ५०६ सहकलम ३४ अन्वयेच्या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करणेत येते.

२. आरोपींचे वैयक्तीक जात मुचलके व जामिनकदबा रद्द करण्यात येतात.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ प्रमाणे प्रत्येकी रुपये १५,०००/– चा जामिन सात दिवसात द्यावा.

४. प्रकरणात जप्त आडजात काठी ३ फुट लांब काठी मुल्यहीन असल्यामुळे अपिल कालावधी नंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावी. तसेच बांबुची काठी ५० इंच लांब व बांबुची काठी ६४ इंच लांब यांची अपिल कालावधी नंतर नियमाप्रमाणे जाहीर लिलावाव्दारे विल्हेवाट करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला).

स्वा/-

दिनांक : ०६/०३/२०२६ (एम. के. कुरे)

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, बार्शिटाकळी.

## सरकार पक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नाव | साक्षिचे स्वरुप |
|---|---|---|
| स.सा.क्र. १ | विनोद जानराव सुलताने (नि.क्र.७८) | फिर्यादी |
| स.सा.क्र. २ | जानराव श्रीराम सुलताने (नि.क्र.८१) | साक्षीदार |

## बचाव पक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नाव | साक्षिचे स्वरुप |
|---|---|---|
| स.सा.क्र. १ | निरंक | निरंक |

## न्यायालयातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नाव | साक्षिचे स्वरुप |
|---|---|---|
| स.सा.क्र. १ | निरंक | निरंक |

## सरकारपक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | नाव | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| स.सा.क्र.१ | सहीपुरते नि.क्र.७९ | जबानी रिपोर्ट |
| स.सा.क्र.१ | सहीपुरते नि.क्र.८० | छापील प्रथम खबरी अहवाल |

## बचाव पक्षातर्फे मान्य केलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | नि.क्र.८०–अ व ८०–ब | वैद्यकिय प्रमाणपत्रे |
| २ | नि.क्र.८०–क | घटनास्थळ पंचनामा |

## बचाव पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## न्यायालयातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## मटेरीयल ऑब्जेक्ट/महत्वाच्या वस्तू

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | बांबुची काठी ५० इंच लांब<br>बांबुची काठी ६४ इंच लांब<br>आडजात काठी ३ फुट |

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Steno | S. E. Nath |
| Name of the Court | CJJD & JMFC, Barshitakli. |
| Date of Order & Judgment | 06.03.2026 |
| Order/Judgment Signed by the P.O. on | 06.03.2026 |
| Order/Judgment uploaded on | 06.03.2026 |